# DVV Clarification

## Criterion-III

## Research, Innovations and Extension

### 3.4 Extension Activities

### 3.4.3


## Media Reports of the Events

# Content


| Sr. No. | Year | Events | Page No. |
|---|---|---|---|
| | Year 2022-23 | | 1 to 13 |
| 1 | | Shri Vyankatesh Mahavidhylaya Celebrates Shivswarjya Din: | 1 |
| 2 | | Mahsul Vibhag Nagar Parishad and Samajik Vanikaran Vibhaga, In one day, 10 thousand plants were planted. | 2-3 |
| 3 | | Free of Cast Yoga Camp | 3-4 |
| 4 | | Deulgaon Raja Balaji Maharaj and Nagar Parshad organized a cleanliness drive | 4-5 |
| 5 | | City Beauty and Clean: Every One Supports | 5-6 |
| 6 | | AIDS Awareness and HIV Testing Camp | 7-8 |
| 7 | | Health Checkup at Balaji Sansthan's Bhakti Nivas Deulgaon Raja, Shri Balaji Sansthan in the city | 8-9 |
| 8 | | Shri Vyankatesh College organized various programs on the occasion of Samata Parv | 10-11 |
| 9 | | Yoga camp for seven days: | 12-13 |
| | Year 2021-22 | | 14 to 19 |
| 1 | | Vyanaktesh College Newly Enrolled Students Induction Program | 14 |
| 2 | | Yoga Day: Students awareness about yoga in their villages | 15 |
| 3 | | Shri Vyankatesh College Woman Empowerment Committee and NSS Department . organized various activities: | 16 |
| 4 | | Vyankartesh College NSS Department Organized camp | 17 |
| 5 | | Join the NSS for own develop “dormant qualities | 18-19 |
| | Year 2020-21 | | 20 to 22 |
| 1 | | Shri Vyankatesh College AIDS Awareness Lectures | 20 |
| 2 | | Blood Donation Awareness | 21 |
| 3 | | Awareness about blood donation on behalf of Shri Venkatesh College, Deulgaon Raja | 21-22 |
| | Year 2019-20 | | 23 to 23 |
| 1 | | Vyankatesh College celebrates Yoga Day | 23 |
| | Year 2018-19 | | 24 to 28 |
| 1 | | Vyankatesh College organized various cleanliness activities | 24 |
| 2 | | Shri Vyankatesh College organized a cleanliness drive and a summer internship program | 25-26 |
| 3 | | Vyankatesh College organized a cleanliness drive | 27 |
| 4 | | Shri Vyanaktesh College Eco-friendly Ganesh Idol Making Workshop | 28 |

**Media Report**

**2022-2023**



# व्यंकटेश महाविद्यालयात शिवस्वराज्य दिन

लोकमत न्यूज नेटवर्क

देऊळगाव राजा : स्थानिक श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र शासन निर्णयानुसार व उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या निर्देशानुसार ६ जून २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन 'शिवस्वराज्य दिन' म्हणून साजरा करण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचेच नव्हे तर अखिल भारताचे प्रेरणास्थान आहेत.

राष्ट्रनिर्माता असलेल्या या महापुरुषाच्या लोककल्याणकारी स्वराज्यातील महत्त्वाचा दिवस म्हणजेच ६ जून १६७४ अर्थात शिवराज्याभिषेक दिन होय, असे विचार यावेळी उपस्थित मान्यवरांनी केले.

या शिवस्वराज्य दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाचे अध्यक्ष श्रीमंत राजे विजयसिंह जाधव यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या निमित्ताने महाविद्यालयात शिवशक राजदंड स्वराज्य गुढी उभारण्यात आली व गुढीचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने व समारोप राष्ट्रगीत गायन करून करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता रासेयो विभागातील महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रूपाली तेलगड, सह कार्यक्रम अधिकारी डॉ. महेंद्र साळवे, सांस्कृतिक कार्यक्रम विभाग प्रमुख प्रा. मधुकर जाधव, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. किरण मोगरकर आदींनी परिश्रम घेतले.

या शिवस्वराज्य दिनाच्या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

1. Shri Vyankatesh Mahavidhylaya Celebrates Shivswarjya Din: June 6, 2022, On behalf of the department of NSS, organized Chhatrapati Shivaji Maharaj Rajabhishek Din. The day was celebrated as Shivswarajya Din. Chhatrapati ShiVaji Maha Raj is not only of Maharashtra, so the whole of India is a place of inspiration. On this occasion, the President of Mahavidyalaya Shrimant Raje Vijaysingh Jadhav, Principal Dr. D. V. Gore, college staff, and students are present.

Shri Vyankatesh College Deulgaon Raja



# देशोन्नती

## महसूल विभाग, नगर परिषद व सामाजिक वनीकरण विभागाचा पुढाकार

# एकाच दिवसात १० हजार वृक्ष लावून देऊळगावराजा नगरीने रचला इतिहास

**देऊळगाव राजा ▪** पर्यावरण संवर्धन काळाची गरज झालेली आहे. पर्यावरण संवर्धन चळवळ ही लोक चळवळ होणे नितांत गरजेचे आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्ताने शासनाच्या माझी वसुंधरा अभियानांतर्गत महसूल विभाग, नगर परिषद व सामाजिक वनीकरण परिक्षेत्र देऊळगावराजा यांच्या पुढाकाराने देऊळगाव राजा नगरीत तहसील कार्यालयासमोर, पंचायत समिती प्रांगण, खोरेश्वर महादेव टेकडी तथा देऊळगाव राजा नगरीत वृक्ष लावण्यात आले.

वृक्षारोपण कार्यक्रमाच्या निमित्ताने भव्य वृक्ष दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. नगर परिषद कार्यालयासमोर सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार डॉ. शशिकांतजी खेडेकर, निवासी उपजिल्हाधिकारी दिनेश गीते, विभागीय वन अधिकारी बी. एन.पायघन, उपविभागीय अधिकारी भूषण अहिरे, देऊळगावराजा तालुक्याचे तहसीलदार श्याम धनमने, नगर परिषद देऊळगाव राजाचे मुख्याधिकारी अरुण मोकळ, वनपरिक्षेत्र अधिकारी एस.डी. गव्हाणे, बालाजी संस्थानचे पारंपारिक विश्वस्त विजयसिंह राजे, सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी रमेशदादा कायंदे, ज्येष्ठ राजकीय पुढारी डॉक्टर रामदास शिंदे, देऊळगाव राजा पोलीस स्टेशनचे ठाणेदार जयवंत सातव, पत्रकार बांधव आदींनी दिंडीला हिरवी झेंडी दाखवली.

देऊळगाव राजा हायस्कूलच्या १११ हरीत दूत व स्वच्छता दुतांच्या वृक्षदिंडी ने सर्वांचेच लक्ष वेधले. तर आमचा तुमचा एकच नारा.. जय वसुंधरा - जय वसुंधरा, एक-दोन-तीन-चार वसुंधरेचा जय जयकार, भारत माता की जय, वंदे मातरम आदी घोषणांनी वातावरण मंत्रमुग्ध झाले होते.

सामाजिक वनीकरणच्या वृक्षारोपना व्यतिरिक्त इतर सर्व वृक्षारोपण हे लोकसहभागातून करण्यात आले. विशेष बाब म्हणजे नगर परिषद देऊळगाव राजाने हटवलेल्या अतिक्रमीत जागेत पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी त्या ठिकाणी ही प्रकर्षाने वृक्षारोपण करण्यात आले. वन संवर्धन दिनाच्या पावन पर्वावर देऊळगाव राजा नगरीने ऐतिहासिक वृक्षारोपण सोहळा अनुभवला हे सर्वांसाठी अभिमानास्पद ! (श.प्र.)

तहसील कार्यालयासमोर सर्व मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण झाल्यानंतर उपस्थितांना जेष्ठ पर्यावरण प्रेमी वनश्री. जनाबापू मेहेत्रे यांनी पर्यावरण प्रतिज्ञा दिली. याप्रसंगी दिनेश गिते व भूषण अहिरे यांनी पर्यावरण संवर्धनात्मक मार्मिक विचार मांडून पर्यावरण संवर्धन चळवळीत प्रत्येकाने सहभागी होण्याचे आवाहन केले. तर अरुण मोकळ यांनी उपस्थित मान्यवर, वृक्षारोपण चळवळीत सहभागी पर्यावरण प्रेमी, पत्रकार बांधव, नगरपरिषद कर्मचारी, देऊळगाव राजा हायस्कूलचे हरित दूत व स्वच्छता दूत, व्यंकटेश महाविद्यालयाचे एन.सी.सी व एन.एस.एस. चे विद्यार्थी, श्री. शिवाजी हायस्कूलचे विद्यार्थी आदींचे आभार मानले.

Buldhana Edition
Jul 24, 2022 Page No. 1
Powered by : eReleGo.com

2. Mahsul Vibhag Nagar Parishad and Samajik Vanikaran Vibhaga, In one day, 10 thousand plants were planted. There is a history in Deulgaon Raja: 24 July 2022 Deulgaon Raja created history by planting 10,000 trees in a single day on the initiative of the Revenue Department, City Council, and Social Forestry Department. Deulgaon Raja Environment has become necessary. It is very important to become involved in the cycle of environmental conservation. On the occasion of the anniversary of Indian independence, under the government's "Maji Vasundhara campaign", the revenue department, city council and social forestry circle, Deulgaon Raja, in front of the Tehsil office in Deulgaon Raja Nagar Panchayat Samiti premises, Khoreshwar Mahadeya hill and Deulgaon Raja tree were planted. Former Sangh MLA Dr. Shashkant Khedekar, Resident Deputy Collector Dinesh Gite, Divisional Forest Officer N. Payghan, Sub Divisional Officer Bhushan Ahire, Village Taluk Tehsildar Shyam Dhanmane, D. Raja Municipal Corporation CO Arun Mokal, Forest Officer D. Gavhane, Balaji Maharaj Traditional Trustee Vijaysinha Jadhav, Retired DY CO RameshDada Kayande, Dr. Ramdas Shinde Deulgaon Raja In order to prevent encroachment in the encroached area again, the historic tree planting ceremony was held by Deulgaon Raja Nagri on the occasion of Forest Conservation Day. All in front of the Tehsil Office After being planted by the dignitaries, senior environmentalist Vanshree Janabapu Mehetre gave a pledge to the attendees. On this occasion, Dinesh Gite and Bhushan Ahire appealed to everyone to participate in the environment conservation darvali by presenting the poignant thoughts of environmental

conservation, while Arun Mokal, the dignitaries present, were environmentalists participating in the tree plantation movement, Municipal Council employees, Green Ambassadors of Deulgaonraja High School, Ranawata Ambassadors of Venkatesh College N.C.C., and NSS students. Police Station Dar Jassar Bandhav and others showed Didi a green puzzle. Deulgaon Raja 11 Hari Vasundhara Jai Vasundhara One-Two-Three-Four Hail to Vasundhara, Bharat Mata Ki Jai Mataram, etc. Apart from all other crops, Buldhana Edition, July 24, 2022, Page No. 1 Powered by eReleGo.com



## नि:शुल्क योग शिबिराचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

देउळगाव राजा : उत्तम आरोग्यासाठी योग व प्राणायाम महत्त्वाचे आहे. योग व प्राणायामचा सराव केवळ शिबिरापुरता मर्यादित न ठेवता त्यामध्ये सातत्य असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन राजे विजयसिंह जाधव यांनी केले. स्थानिक श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देऊळगाव राजा येथे सात दिवसीय नि:शुल्क योग व प्राणायाम शिबिरास सुरुवात झाली आहे. या शिबिराचे उद्घाटन करताना ते बोलत होते.

महाविद्यालयातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग, राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजना या विभागांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सात दिवस चालणाऱ्या या नि:शुल्क योग शिबिरास श्रीकिशन डागा, पतंजली योग समिती, योगभूमी परिवार, जालना हे मार्गदर्शन करत आहेत. पहिल्या दिवसाच्या योग शिबिराची सांगता शांतीपाठाने करण्यात आली. यावेळी नागरिक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

3. Free of Cast Yoga Camp Get Inaugurated: Inauguration of Free Yoga Camp Lokmat News Network Deulgaon Raja: Yoga and pranayama are important for good health. Raje Vijaysinh Jadhav asserted that the practice of yoga and pranayama should not be restricted to camp only and should be consistent. A seven-day free yoga and pranayama camp has started at the local Shri Venkatesh Arts, Commerce, and Science College, Deulgaon Raja. He was speaking while inaugurating this camp. This camp has been organized in association with the Department of Sports and Physical Education, the National Cadet

Corps, and the National Service Scheme of the college. This seven-day free yoga camp is being guided by Shrikishan Daga, Patanjali Yoga Samiti, Yogabhumi Parivar, and Jalna. The first day of yoga camp was concluded with Shantipatha. Citizens, teachers and students were present on this occasion, free of cost Yoga Camp organized by Department of NCC and NSS for the College Students, Local Citizens.

**लोकमत**

# दे. राजा येथे श्री बालाजी संस्थान व नगर परिषदेने राबविली स्वच्छता मोहीम

लोकमत न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा** : स्थानिक श्री व्यंकटेश महाविद्यालयात नगर परिषद, रासेयो विभाग, एनसीसी विभाग, सांस्कृतिक विभाग व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्वछता पंधरवडानिमित्त शहरातील श्री खंडोबा टेकडी, श्री बालाजी मंदिर परिसरात स्वच्छता, प्लास्टिक निर्मूलन, कॉंग्रेस गवत निर्मूलन असे अनेक उपक्रम राबविण्यात आले.

महाविद्यालयात स्वच्छ भारत सुंदर भारत व स्वच्छता आणि आरोग्य या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्वच्छता पंधरवडानिमित्त महाविद्यालयीन स्तरावर अतिथी व्याख्यान २३ सप्टेंबर आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाची सांगता स्वच्छतेची शपथ घेऊन करण्यात आली.

स्वच्छता पंधरवडानिमित्त महाविद्यालय ते श्री बालाजी मंदिर



जनजागृतीपवर पथनाट्य सादर करताना विद्यार्थिनी.

अशी स्वच्छताविषयक जनजागृती रॅली काढण्यात आली. यादरम्यान छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाची स्वच्छता करून अभिवादन करण्यात आले. श्री बालाजी महाराज वार्षिक उत्सव व यात्रा विचारात घेऊन मंदिर परिसरामध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानाचे उदघाटन मुख्याधिकारी अरुण मोकळ यांनी केले. अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्ते जगदीश कापसे, सहायक पोलीस निरीक्षक दत्तात्रय वाघमारे उपस्थित होते. अध्यक्ष म्हणून श्री बालाजी संस्थानचे वंशपारंपरिक विश्वस्त व महाविद्यालयाचे अध्यक्ष राजे विजयसिंह जाधव हे उपस्थित होते. किशोर बीडकर, प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे, राजेंद्र वानखेडे यांची उपस्थिती होती.

Hello Buldhana
Page No. 3 Sep 26, 2022
Powered by: erelego.com

4.Deulgaon Raja Balaji Maharaj and Nagar Parshad organized a cleanliness drive on September 26, 2022. The Swachhta Mohim was conducted by Shri Balaji Sansthan and Nagar Parishad at the Deulgaon Raja Lokmat News Network. Deulgaon Raj: Local in Shri Venkatesh College, many activities like cleanliness, plastic removal, removal of Congress grass were implemented in the area of Shri Khandoba Hill, Shri Balaji Temple area of the city on the occasion of Swachta Fortnight jointly organized by Municipal Council, Radio Department, NCC Department, Cultural Department of College. An essay competition was organized at the college on Swachh Bharat, Sunder Bharat, cleanliness, and health. On the occasion of Swachhta Fortnight, a guest lecture was organized at the college level on

Shri Vyankatesh College Deulgaon Raja

September 23. The program concluded with an oath of cleanliness. College to Shri Balaji Temple on the occasion of Swachhta Fortnight A student is performing a street play to raise public awareness. Such public awareness rallies were held. Meanwhile, Chhatrapati Shivaji Maharaj's and Dr. Babasaheb Ambedkar's memorials were cleaned and saluted. Keeping Shri Balaji Maharaj's annual festival and yatra in mind, a cleanliness drive was carried out on the temple premises. The campaign was inaugurated by Chief Officer Arun Mokal, and social activist Jagdish Kapse and Assistant Police Inspector Dattatray Waghmare were present as guests. Raje Vijaysinh Jadhav, hereditary trustee of Shri Balaji Sansthan and president of the college, was present as president. Kishore Bidkar, Principal Dr. Dnyaneshwar Gore, and Rajendra Wankhede were present. Hello Buldhana, Page No. 3, September 26, 2022 Powered by erelego.com.

दिव्य मराठी बुलडाणा 25-09-2022

स्वच्छता मोहीम • मुख्याधिकारी अरूण मोकळ यांचे नागरिकांना आवाहन

# शहर स्वच्छ, सुंदर ठेवण्यासाठी प्रत्येकाने सहकार्य करण्याची गरज





स्वच्छता मोहीमे दरम्यान मार्गदर्शन करताना मुख्याधिकारी अरूण मोकळ व उपस्थित अन्य. तर दुसऱ्या छायाचित्रात स्वच्छतेचे महत्व पटवून देताना विद्यार्थीनी.

**प्रतिनिधी** | देऊळगावराजा

आपले शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याची जबाबदारी ही प्रत्येक शहरातील प्रत्येक नागरिकांची आहे. प्रत्येक नागरिकाला आपल्या घरातील व परिसरातील घनकचरा टाकण्यासाठी नगर पालिका प्रशासनाच्या वतीने शहरात नियमीत घंटा गाड्या फिरवण्यात येतात. नागरिकांनी घंटा गाडीतच ओला व सुका कचरा टाकावा आणि शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी पालिका प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी अरूण मोकळ यांनी केले.

स्थानिक श्री व्यंकटेश महाविद्यालयात नगर परिषद, रा. से. यो. विभाग, एन सी सी विभाग, सांस्कृतिक विभाग व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता पंधरवड्यानिमित्त शहरातील श्री खंडोबा टेकडी, श्री बालाजी मंदीर परिसर इत्यादी भागात स्वच्छता, प्लास्टिक निर्मूलन, काँग्रेस गवत निर्मूलन, असे अनेक उपक्रम राबवण्यात आले. महाविद्यालयात ''स्वच्छ भारत सुंदर भारत '' व ''स्वच्छता आणि आरोग्य'''' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्वच्छता पंधरवडा निमित्त महाविद्यालयीन स्तरावर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाची सांगता स्वच्छतेची शपथ घेऊन करण्यात आली. स्वच्छता पंधरवडा निमित्त महाविद्यालय ते श्री बालाजी मंदीर अशी स्वच्छताविषयक जनजागृती रॅली काढण्यात आली. या दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाची स्वच्छता करून अभिवादन करण्यात आले. श्री बालाजी महाराज वार्षिक उत्सव व यात्रा विचारात घेऊन मंदिर परिसरामध्ये स्वच्छता अभियान राबवण्यात आले. या अभियानाचे उद्घाटन मुख्याधिकारी अरुण मोकळ यांनी केले. अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्ते जगदिश कापसे, पीएसआय वाघमारे उपस्थित होते. अध्यक्ष म्हणून श्री बालाजी संस्थानचे वंश-पारंपरिक विश्वस्त व महाविद्यालयाचे अध्यक्ष राजे विजयसिंह जाधव उपस्थित होते. व्यासपीठावर संस्थानचे व्यवस्थापक किशोर बीडकर, प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे, राजेंद्र वानखेडे यांची उपस्थिती होती.

मुख्याधिकारी अरूण मोकळ यांनी उद्घाटकीय मनोगत स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना राजे विजयसिंह जाधव यांनी विद्यार्थ्यांकडून केवळ श्रमदान करून घेणे हा या कार्यक्रमाच्या आयोजानामागील हेतू नसून या माध्यमातून शहरात स्वच्छतेविषयी जनजागृती व्हावी हा आहे, असे मत व्यक्त केले.रॅलीमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी प्रा. मधुकर जाधव लिखित पथनाट्य सादर करून स्वच्छतेचा संदेश दिला. डॉ. आर. एच. देवरे यांनी श्री बालाजी संस्थानच्या इतिहासाविषयी माहिती दिली. सर्व विद्यार्थ्यांनी दहा गटांमध्ये श्री बालाजी मंदिर परिसराची स्वच्छता केली. स्वच्छतेचे नियम पाळण्याविषयीचे माहितीपत्रक घरोघरी वितरित करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांची श्री बालाजी संस्थानच्या वतीने अन्नछत्रामध्ये भोजनाची व्यवस्था करण्यात आली.प्रास्ताविक प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांनी केले.सूत्रसंचालन डॉ. महेंद्र साळवे यांनी तर आभार डॉ. रामेश्वर माने यांनी मानले. या स्वच्छता अभियानासाठी रा.से. यो. महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रूपाली तेलगड, सहकार्यक्रम अधिकारी डॉ. ज्योती ढोकले, प्रा, मंजूषा मुळे, डॉ. गजानन तांबडे यांच्यासह प्राध्यापकांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Shri Vyankatesh College Deulgaon Raja

5. City Beauty and Clean: Every One Supports: September 25, 2022 : Deulgaon Raja It is the responsibility of every citizen of every city to keep their city clean and beautiful. Municipal administration regularly circulates garbage carts in the city for every citizen to dump solid waste from his house and locality. Spokesman Arun Mokal appealed to the citizens to throw wet and dry waste in the gong car and cooperate with the municipal administration to keep the city clean and beautiful. Municipal Council Res in local Venkatesh college, NSS Department, NCC Department, Cultural Department, and Junior College on the occasion of Swachata Fortnight, Sri Khandoba Hill, Sri Balaji Mandir area of the city. An essay competition on cleanliness and health was organized in the college "Swachh Bharat Sunder Bharat" to implement many activities like cleanliness, plastic elimination, congress grass elimination, etc. A guest lecture was organized at the college level on the occasion of Swachhta. The program concluded with an oath of cleanliness. A public awareness rally was held from the college to Shri Balaji Mandir on the occasion of Swachhta Fortnight. Meanwhile, Chhatrapati Shivaji Maharaj's and Dr. Babasaheb Abidkar's memorials were cleaned and saluted. Keeping Sri Balaji Maharaj's annual festival and yatra in mind, a cleanliness campaign was conducted on the temple premises. The campaign was inaugurated by the Chief Officer, Arun Mokal. Social activists Jagdish Kapse and PSI Waghmare were present as guests. Raje Vijaysinh Jadhav of the college was present on the platform, as were the administrators of the institute, Kishore Bidkar, Principal Dr. Dnyaneshwar Gore, and Rajendra Yankhede. Shri Arun Mokal explained the importance of cleanliness during the inauguration ceremony. Raje Vijaysinh Jadhav expressed the opinion during the presidential address that the purpose behind organizing the program is not only to donate labor from the students but to raise awareness about cleanliness in the city through this method. The participating schools Written by Madhukar Jadhav, cleanliness rules and arrangements were made. Moderator Dr. Rameshwar Mane believed. For this cleanliness campaign, Women Program Officer Dr. Jyoti Dokle, Prof. Manjusha Mule, and Dr. Gajanan Tambade worked hard. A large number of journalists were present for this event.

Shri Vyankatesh College Deulgaon Raja



आपल्या शहरातील प्रत्येक बातमी साठी स्थान

आमच्या सोबत..आता दररोज रहा अपडेट !

# परतवाडा टाईम्स

SOCIAL MEDIA EDITION

संपादक:-नरेश तायवाडे

RNI NO. - MAHBIL/2018/80744

देशमुख प्लॉट,पेन्शनपुरा परतवाडा ता.अचलपूर,जि.अमरावती-444805 | भ्रमणध्वनी-9552970699 paratwadatimes@gmail.com | paratwadatimes | paratwadatimes

दि. 23-08-2022

## श्री व्यंकटेश महाविद्यालयात एड्स विषयक जनजागृती व्याख्यान व एच.आय.व्ही. तपासणी शिबिर संपन्न

**बुलढाणा | गणेश मुंढे**

स्थानिक श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून एड्स जनजागृती व आरोग्य या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ग्रामीण रुग्णालय दे. राजा येथील आयसीटीसी प्रमुख श्री.पंकज खरे, श्री. भरत राठोड, मातृभूमी फाऊंडेशन, बुलडाणा च्या श्रीमती पुनम मावळे, श्रीमती राधिका इंगळे, श्री. ढोकणे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांची उपस्थिती होती.प्रमुख अतिथी श्री. पंकज खरे यांनी विद्यार्थी-विद्यार्थिनींना एड्स या रोगाविषयी तसेच त्यापासून दूर राहण्यासाठी घ्यावयाच्या काळजीविषयी मार्गदर्शन केले. श्रीमती पुनम मावळे, श्रीमती राधिका इंगळे यांनी उपस्थित सर्व रासेयो स्वयंसेवक व स्वयंसेविकांना एड्सविषयी असणारे समज-गैरसमज, एड्स होण्याची कारणे याविषयी माहिती दिली. विवाहपूर्व एड्स चाचणी करणे किती महत्वाचे आहे. हे ही त्यांनी पटवून दिले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांनी आयुष्य खूप सुंदर आहे ते जपा व जीव धोक्यात घालणा-या गोष्टींपासून दूर रहा असे आवाहन केले. या प्रसंगी एच.आय.व्ही. तपासणी शिबिराचेही आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन ग्रंथपाल डॉ. उमेश देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाले. महाविद्यालयातील प्राध्यापकांसह ७५ विद्यार्थ्यांनी या शिबिरात एच.आय.व्ही. तपासणी करुन घेतली. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रूपाली तेलगड यांनी केले. अतिथी परिचय रासेयो सह-कार्यक्रम अधिकारी डॉ. रामेश्वर माने यांनी दिला. सूत्रसंचालन रासेयो महिला सह-कार्यक्रम अधिकारी डॉ. ज्योती ढोकले यांनी व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. महेंद्र साळवे यांनी केले.

परतवाडा, अंजनगांव, दर्यापूर आणि वरुड येथील नामवंत मोबाईल शोरुम
मोबाईल
एक्सेसरीज
रिपेअरींग
भाईG मोबाईल गॅलरी
मल्टीब्रॅन्ड मोबाईल शोरुम
रोषण अग्रवाल 9881854050
रोहीत अग्रवाल 7020703211
मदन महल, जयस्तंभ चौक, परतवाडा. | मरीमाता मंदीराजवळ, बनोसा, दर्यापूर. | इलेक्ट्रीक ऑफीसच्या समोर, मेन रोड, अंजनगांव | श्री कृष्ण प्लाझा, पांढुर्णा चौक, वरुड

6. AIDS Awareness and HIV Testing Camp: August 23, 2022 The awareness lecture on AIDS at Shri Venkatesh College and the H.I.V. inspection camp were completed. A guest lecture on AIDS awareness and health was organized at the local Shri Venkatesh College of Arts, Commerce, and Science in association with the National Service Scheme Department and the Internal Grievance Redressal Committee under Azadi Ka Amrit Mahotsava on the occasion of International Youth Day. D. Raja Rural Hospital was the chief guest on the occasion. Head of ICTC Shri. Pankaj Khare, Mr. Bharat Rathore, Mrs. Punam Mawle, and Mrs. Radhika Ingle of Matrubhumi Foundation, Buldana, Shri. Dhokane were present. The program was presided over by the principal of the college, Dr. Dnyaneshwar Gore, who was present. Chief Guest Shri. Pankaj Khare guided the students about AIDS and the precautions to be taken to stay away from it. Smt. Poonam Mawle and Smt. Radhika Ingle present to all the NSS volunteers and volunteers the misconceptions about AIDS and the causes of AIDS. I was informed about this. How important is premarital AIDS testing? He proved this. While expressing the presidential message, the principal of the college, Dr. D. V. Gore, said that

life is very beautiful; cherish it and stay away from life-threatening things. On this occasion, H.I.V. An inspection camp was also organized. The camp was inaugurated by librarian Dr. Umesh Deshmukh. 75 students, along with professors from the college, tested positive for HIV in this camp. On this occasion, all the teachers, non-teaching staff, and NSS volunteers of the college were present. Introductory to this program: NSS Women's Program Officer Dr. Rupali Telgad, Guest Introduction NSS Co-Program Officer Dr. Rameshwar Mane, Coordinating NSS Women's Co-Program Officer Dr. Jyoti Dhokle, and NSS Program Officer Dr. Mahendra Salve did.



श्री बालाजी संस्थानच्या भक्त निवासामध्ये आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



नवराष्ट्र

# बालाजी संस्थानच्या भक्तनिवासात आरोग्य तपासणी

देऊळगाव राजा, (वा.). शहरातील श्री बालाजी संस्थान, श्री व्यंकटेश महाविद्यालयातील एन.एस.एस. विभाग तसेच एन.सी.सी विभाग व डॉ. हेडगेवार रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने 15 ऑक्टोबर रोजी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन श्री बालाजी संस्थानचे वंशपारंपरिक विश्वस्त राजे विजयसिंह जाधव यांच्या हस्ते संपन्न झाले. प्रमुख अतिथी म्हणून हेडगेवार रुग्णालयातील स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. वैशाली खडके या उपस्थित होत्या. अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे उपस्थित होते. उद्घाटकीय मनोगत व्यक्त करताना राजे विजयसिंह जाधव यांनी डॉ. हेडगेवार रुग्णालयाच्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले. या ट्रस्टच्या सहकार्याने श्री बालाजी संस्थानच्या शंभर एकर जागेवर रुग्णसेवा करण्यासाठी एक भव्य रुग्णालय तसेच इतर शैक्षणिक सेवा भविष्यात उभारल्या जातील, अशी माहितीही राजे जाधव यांनी दिली. अतिथी म्हणून मनोगत व्यक्त करताना डॉ. वैशाली खडके यांनी माफक दरात सामान्य माणसाला सेवा हे ब्रीद समोर ठेवून डॉ. हेडगेवार रुग्णालय कार्य करीत आहे, असे प्रतिपादन केले. शिबिर उद्घाटन समारोहाचे सूत्रसंचालन प्रा. मधुकर जाधव यांनी केले. या शिबिरामध्ये डॉ. दीपक भिसेगावकर यांनी रुग्णांची कान, नाक, घसा तपासणी केली. डॉ. खडके यांनी महिला आरोग्य तपासणी, डॉ. सागर गुप्ता यांनी मधुमेह व रक्तदाब तपासणी, डॉ. अभिषेक परळीकर यांनी लहान मुलांची तपासणी, डॉ. श्रीकांत देशमुख यांनी किडणीसंबंधीच्या आजाराची तपासणी, डॉ. श्रीकांत दहिभाते यांनी मणक्यांच्या आजाराची तपासणी केली. डॉ. पिनाकिन पुजारी यांनी लहान मुलांच्या शस्त्रक्रिया निदानाविषयी मार्गदर्शन केले. डॉ. अविनाश बुचे यांनी संधीवात असलेल्या रुग्णांची तपासणी केली.

## प्राध्यापकांनी घेतले परिश्रम

डॉ. यतीन्द्र अष्टपुत्रे यांनी हृदय शल्य चिकित्सा व जनरल फिजीशियन डॉ. सुधीर देशपांडे यांनीही रुग्णांची तपासणी केली. तपासणीसाठी आलेल्या रुग्णांना मोफत औषधीही वितरित करण्यात आली. तसेच गरजूंना सवलतीच्या दरात तपासणीसाठी लॅब उपलब्ध करून देण्यात आली. देऊळगाव राजा शहरातील व 40 पेक्षा अधिक ग्रामीण भागातील 530 रुग्णांनी नोंदणी करून या शिबिरात आरोग्य तपासणी करून घेतली. पूर्व नोंदणी करणा-या रुग्णांना प्राधान्य देण्यात आले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. हेडगेवार रुग्णालयाचे अप्पा कुलकर्णी, देऊळगाव राजातील मयुर पुजारी, डॉ. महेंद्र साळवे, डॉ. रामेश्वर माने, डॉ. रूपाली तेलगड, डॉ. ज्योती ढोकले, डॉ. महेश तांदळे, डॉ. गजानन तांबडे, डॉ. राहूल खवल यांच्यासह इतर प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.

Washim Buldhana Plus Edition
17 October 2022 Page No. 3
epaper.navarashtra.com

Shri Vyankatesh College Deulgaon Raja

7.Shri Balaji Sanstan Bhakt Nivas: October 15, 2022 Health Checkup at Balaji Sansthan's Bhakti Nivas Deulgaon Raja, Shri Balaji Sansthan in the city, Shri Venkatesh College NSS Department, as well as the NCC Department, and a health screening camp were conducted on October 15 in association with Hedgewar Hospital. The camp was inaugurated by Raje Vijay Singh Jadhav, hereditary trustee of Shri Balaji Sansthan. Gynecologist Dr. Hedgewar Hospital was the chief guest. Vaishali Khadke was present; Principal Dr. Dnyaneshwar Gore was present; and Raje Vijaysinh Jadhav was present while expressing the opening speech. I appreciated the social activities at Hedgewar Hospital. With the help of this trust, a grand hospital and other educational services were set up in the future on the 100-acre site of Shri Balaji Sansthan. The professors worked hard, including Dr. Yatindra Ashtaputre, a heart surgeon and general physician. Sudhir Deshpande also examined the patients. Free medicines were also distributed to the patients who came for examination. Labs were also made available to the needy at discounted rates for Deulgaon Raja city and more than 40 rural villages. Raje Jadhav also informed me that he will go speak as a guest, Dr. Vaishali Khadve, keeping the motto of serving the common man at a moderate price. He asserted that Hedgewar Hospital is functioning. The camp opening ceremony was coordinated by Prof. Madhukar Jadhav. In this camp, Dr. Deepak Bhisegaonkar examined the ears, nose, and throat of the patients. Dr. Khadke's women's health examination, Dr. Sagar Gupta's diabetes and blood pressure check, Dr. Abhishek Parlikar's examination of children, Dr. Deshmukh's examination of digestive diseases, and Dr. Srikant Dahibhate's investigation of spinal diseases. Dr. Pinakin Pujari guided the surgical diagnosis of children. Dr. Avinash Buche examined the opportunistic patients. 530 patients from the area registered and underwent health check-ups in this camp. Preference was given to pre-registered patients. To make this camp a success, Dr. Appa Kulkarni of Hedgewar Hospital, Mayur Pujari of Deulgaon Raja, Dr. Mahendra Salve, Dr. Rameshwar Mane, Dr. Rupali Telgad, Dr. Jyoti Dhokle, Dr. Mahesh Tandale, Dr. Gajanan Tambade, and Dr. Rahul Khawal, along with other professors, worked hard. Srikanth Hashim Buldhana Plus Edition, October 17, 2022, Page No. 3. epaper.navarashtra.com

सांज दैनिक जनआधार    गुरुवार दिनांक 1 डिसेंबर २०२२    ३




# श्री व्यंकटेश महाविद्यालयात समता पर्व निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

दे.राजा : स्थानिक श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २६ नोव्हेंबर, संविधान दिन ते ६ डिसेंबर, महापरिनिर्वाण दिन या कालावधीदरम्यान राबविण्यात येत असलेल्या 'समता पर्व' निमित्ताने विविध शैक्षणिक व पूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

संविधान दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग, रा. से. यो. विभाग व एन.सी.सी. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'ओळख आपल्या संविधानाची' या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून उपस्थित औरंगाबाद येथील मोटीव्हेशनल स्पिकर अ‍ॅड. राहुल नावंदर यांनी उपस्थितांना संविधानाचे महत्व समजावून सांगितले तसेच संविधानाने दिलेले मूलभूत हक्क आणि कर्तव्ये याबाबत मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे उपस्थित होते. या प्रसंगी त्यांनी प्रत्येक भारतीय नागरिकाने आपल्या घटनात्मक जबाबदाऱ्या व कर्तव्यांचे पूर्ण निष्ठेने पालन केले तरच आपल्या घटनात्मक अधिकारांना महत्त्व राहील तसेच आपल्या मूलभूत अधिकारांचा वापर करत असताना इतरांना प्राप्त घटनात्मक अधिकारांचा आदर करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे आद्य कर्तव्य आहे, असे प्रतिपादन केले.

या प्रसंगी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. महेंद्र साळवे यांनी संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अनंत आवटी यांनी केले तर सूत्रसंचालन रासेयो महिला सहकार्यक्रम अधिकारी डॉ. ज्योती ढोकले यांनी व आभार प्रदर्शन रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रुपाली तेलगड यांनी केले.

समता पर्वाच्या अंतर्गत दि. २८ नोव्हेंबर रोजी महाविद्यालयातील रासेयो विभाग व एनसीसी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान विषयक जनजागृती प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, संविधानाचे महत्त्व, इत्यादी विविध विषयावरील घोषवाक्यांचे फलक हाती घेऊन व घोषणा देऊन उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या प्रसंगी शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला अभिवादन करून प्रभात फेरीचा समारोप करण्यात आला.

समता पर्वाच्या निमित्ताने आयोजित विविध उपक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी श्री बालाजी संस्थानचे वंशपारंपरिक विश्वस्त व श्री व्यंकटेश महाविद्यालयाचे अध्यक्ष राजे विजयसिंह जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांच्या नेतृत्वात राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अनंत आवटी, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. महेंद्र साळवे, रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रुपाली तेलगड, रासेयो सहकार्यक्रम अधिकारी डॉ. रामेश्वर माने, रासेयो महिला सहकार्यक्रम अधिकारी डॉ. ज्योती ढोकले तसेच ए. एन. ओ. डॉ. महेश तांदळे, एन. सी. सी. केअर टेकर डॉ. गजानन तांबडे व महाविद्यालयातील प्राध्यापकांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमामध्ये रासेयो स्वयंसेवक, राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट्स व महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

8. Shri Vyankatesh College organized various programs on the occasion of Samata Parv: 01 December 2022: Shri Venkatesh Arts, Commerce, and Science College organized Various educational and supplementary activities are being organized on the occasion of 'Samata Parva', which is being implemented between November 26th, Constitution Day, and December 6th, Mahaparinirvana Day. On the occasion of Constitution Day, the Department of Political Science in the college, the NSS Department, and the N.C.C. A guest lecture was

organized on the topic 'Knowledge of our Constitution' in association with the department. Aurangabad's motivational speaker, Adv. Rahul Navander, explained the importance of the Constitution to the attendees and guided them about the basic rights and duties given by the Constitution of the program. The principal of the college, Dr. Dnyaneshwar Gore, was present. On this occasion, he asserted that it is the primary duty of every Indian citizen to respect the constitutional rights of others while exercising their fundamental rights and fulfilling their constitutional responsibilities and duties with full loyalty. On this occasion, NSS Program Officer Dr. Mahedra Salve prefaced the program by reading the Preamble of the Constitution. Head of State Administration Department Dr. Anant Awati did it, as did NSS Women's Cooperation Program Officer Dr. Jyoti Dhokle and NSS Women's Program Officer Dr. Rupali Telgad. A public awareness drive on the Constitution was organized in association with the NSS Department and the NCC Department of the college. In this, the students of the college took spontaneous participation by holding placards and making slogans on various topics like freedom of occupation, equality, fraternity, national unity, pan-religious harmony, the importance of the constitution, etc. On this occasion, Prabhat Feri concluded by saluting the Bharat Ratna Dr. Babasaheb Ambedkar Paria Memorial. For the successful organization of various activities organized on the occasion of Samata Parva, hereditary trustee of Shri Balaji Sansthan and Shri Venkatesh College under the guidance of President Raje Vijaysinh Jadhav and Principal Dr. Dnyaneshwar Gore, Head of State Administration Department Dr. Anant Awati, NSS Program Officer Dr. Mahendra Salve, NSS Women's Program Officer. Dr. Rupali Telgad, NSS Co-Program Officer. Dr. Rameshwar Mane, NSS Women's Co-Program Officer Jyoti Dhokle, and A. N. O. Lt. Dr. Mahesh Tandale, N. C. C. Caretaker Officer Dr. Gajanan Tambade, worked hard. The program was attended by students and cadets of the college in large numbers.

Shri Vyankatesh College Deulgaon Raja



दिव्य मराठी

बुलडाणा 08-12-2022

दिव्य मराठी विशेष • राजे विजयसिंह जाधव यांचे प्रतिपादन, व्यंकटेश महाविद्यालयात योग शिबिर

# शिबिरापुरतेच योग मर्यादित न ठेवता सातत्य हवे

प्रतिनिधी | देऊळगावराजा

योग व प्राणायाम शिबिरा पुरतेच मर्यादित न ठेवता त्यामध्ये सातत्य ठेवणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन राजे विजयसिंह जाधव यांनी केले.

येथील श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सात दिवसीय निशुल्क योग व प्राणायाम शिबिरास सुरुवात करण्यात आली आहे. महाविद्यालयातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग, राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजना या विभागांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

५ डिसेंबर रोजी सुरू झालेल्या या शिबिराचे उद्घाटन संस्थाध्यक्ष राजे विजयसिंह जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना त्यांनी उत्तम आरोग्यासाठी योग व प्राणायामचे महत्त्व उपस्थितांना पटवून दिले. योग व प्राणायामचा सराव केवळ शिबिरापुरताच मर्यादित न ठेवता त्यामध्ये नियमितता येणे गरजेचे असल्याचे सांगुन यासाठी श्री बालाजी संस्थान व महाविद्यालय नेहमीच प्रयत्नशील राहील अशी ग्वाही दिली.

या उपक्रमाला जर उत्तम प्रतिसाद मिळाला तर महाविद्यालयात असे शिबिर वारंवार आयोजित करण्यात येईल, असे सांगितले. त्यासाठी नागरिकांनी या उपक्रमाला भरघोस प्रतिसाद द्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. नियमित योगा करू इच्छिणाऱ्या नागरिकांसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली. सात दिवस चालणाऱ्या या निशुल्क योग शिबिरास जालना येथील श्रीकिशन डागा हे मार्गदर्शन करीत आहेत. यावेळी त्यांनी पहिल्या दिवसाच्या योग शिबिराची सुरुवात प्रार्थनेने केली. सुरुवातीला प्राणायामाचा एक एक प्रकार समजावून सांगून त्यांचे शरीर स्वास्थ्यावर होणाऱ्या सकारात्मक परिणामाची माहिती देऊन सर्व प्राणायामांचा सराव करून घेतला.

सिंहासन, हास्यासन अशा मजेशीर आसनांचा सराव करून घेऊन उपस्थितांना आनंद दिला. शिबिरासाठी गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहात आहेत. योग शिबिराच्या यशस्वितेसाठी क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे डॉ. किरण मोगरकर, राष्ट्रीय छात्र सेनेचे डॉ. महेश तांदळे व राष्ट्रीय सेवा योजनेचे डॉ. महेंद्र साळवे यांच्यासहित अनेकजण परिश्रम घेत आहेत.

प्राणायाम व शिबीरास उपस्थीत साधक

9. Yoga camp for seven days: December 8, 2022, Divya Marathi Special: Raje Vijaysinh Jadhav, the yoga camp at Venkatesh College, should be continuous and not limited to the camp itself.: Raje Vijaysinh Jadhav asserted that yoga and pranayama should not be limited to camp and should be continued. A seven-day free yoga and pranayama camp has been started at Shri Venkatesh Arts, Commerce, and Science College, Deulgaon Raja. The camp has been organized in association with the sports, physical education, NCC, and NSS departments. It started on December 5. The camp was inaugurated by Raje Vijaysinh Jadhav, President of the Institute. He was talking at that time to convince the audience about the importance of yoga and pranayama for good health. Saying that the practice of yoga and pranayama should not be limited only to camp; it is necessary to have regularity in it, and ensuring that Shri Balaji Sansthan and College will always strive for this. If this initiative gets a good response, then such camps will be organized frequently in the college, said the citizens for this initiative. Positive outcome information Practice all pranayama by having Seekers present for pranayama during camp. At this time, he called for a response. He assured that all the necessary facilities would be made available for the citizens who wanted to do yoga regularly. This free yoga is going on for seven days. The camp is being guided by Shrikishan Daga from Jalna. On this occasion, he started the first day of the yoga camp with a prayer. In the beginning, by explaining each type of Pranayama, their body will be healthy. He entertained the audience by practicing fun asanas such as the throne and the laughing posture. A large number of prominent citizens of the village, including women, teachers, non-teaching staff, and male and female students, are present for the camp. Sports and Physical

Education Department, for the success of the yoga camp by Dr. Kiran Mogarkar, ANO Lt. Dr. Mahesh Tandale, and NSS programmed officer Dr. Mahendra Salve, are working hard.




Shri Vyankatesh College Deulgaon Raja

## 2021-2022



epaper.lokmat.com 3

औरंगाबाद, बुधवार, दि. २९ डिसेंबर २०२१

# व्यंकटेश महाविद्यालयात नवप्रवेशित विद्यार्थिनींना तज्ज्ञांकडून मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा :** येथील श्री व्यंकटेश महाविद्यालयात महिला विकास समिती व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने नवप्रवेशित विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यासाठी विविध उपक्रम आयोजित करण्यात आले.

नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींना महिला विकास समिती व अंतर्गत तक्रार समितीच्या उद्देशाविषयी माहिती व्हावी, त्यांना आरोग्यदायी वातावरणात आनंदाने शिक्षण घेता यावे, यासाठी अंतर्गत तक्रार समितीच्या सहकार्याने इंडक्शन कार्यक्रम व भारतीय दंड संहितेविषयी जागरूकता' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. समितीच्या अध्यक्ष डॉ. ज्योती ढोकले यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले. समितीच्या सदस्या मालती कायंदे यांनी शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी उपलब्ध संधी व उच्च शिक्षणाचे महत्त्व याविषयी माहिती दिली. कार्यक्रमांच्या यशस्वितेसाठी प्रा. बाळासाहेब काळे, डॉ. रूपाली तेलगड, डॉ. महेंद्र साळवे, डॉ. ज्योती ढोकले, प्रा.औटी यांनी परिश्रम घेतले.

## आरोग्यासह कायद्यांची माहिती

अॅड. अर्चना घेवंदे यांनी महिलांच्या कायदेशीर हक्कांबाबत विद्यार्थिनींना प्रबोधन केले. तसेच भारतीय दंड संहिता याविषयी माहिती दिली. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विद्यालयात एड्स जनजागृती सप्ताह राबविला. यात एचआयव्ही रोगाविषयी जनजागृती करून चाचणी उपक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास देऊळगाव ग्रामीण रुग्णालयाचे समुपदेशक पंकज खरे यांनी मार्गदर्शन केले.

1. Vyanaktesh College Newly Enrolled Students Induction Program: December 29, 2021: Expert guidance for new students at Venkatesh College Lokmat News Network Deulgaon Raja: Shri Venkatesh is here. Various activities were organized to guide the newly admitted students on behalf of the Women Development Committee and the National Service Scheme Department at the college. An induction program with the support of the Internal Grievance Committee is organized for the newly admitted students to learn about the purpose of the Women Development Committee and the Internal Grievance Committee so that they can study happily in a healthy environment. Information on laws, including health Adv. Archana Ghevde enlightened the students about the legal rights of women. She also gave information about the Indian Penal Code. On behalf of the National Service Scheme Department, Awareness of the Indian Penal Code A one-day workshop on this topic was conducted by Committee Chairman Dr. Jyoti Dhokle. In this workshop, members of the committee protested Malti Karade, i.e., the tuition payer. Opportunities available for girls and higher Information about the importance of education For the success of Deli programs, Prof. Balasaheb Kale, Dr. Rupali Telgad, Dr. Mahendra Salve, Dr. Jyoti Dhikale, and Prof. Anant Awati worked hard. *AIDS Awareness Week was conducted at the school. In this way, testing activities were conducted by spreading awareness about HIV disease. The program was inaugurated by Pankaj Khare, counselor of Rural Hospital Guided*.

Shri Vyankatesh College Deulgaon Raja



# विद्यार्थ्यांनी आपल्या गावामध्येच प्राणायामाचा प्रचार, प्रसार करावा

## राजे विजयसिंह जाधव यांचे आवाहन, व्यंकटेश महाविद्यालयात योग दिन

**प्रतिनिधी** | देऊळगाव राजा

आपल्या भारतीय प्राचीन योग विद्येचा स्वीकार आता संपूर्ण विश्वाने केला आहे. महाविद्यालयातील बहुतांश विद्यार्थी हे ग्रामीण भागातील आहेत. ग्रामीण भागामध्ये योग व प्राणायामाचा हवा तसा प्रसार व प्रचार झाला नाही. केवळ संकल्प करून चालणार नाही तर त्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या गावात योगा व प्राणायामाचा प्रचार व प्रसार करावा असे आवाहन महाविद्यालयाचे अध्यक्ष राजे विजयसिंह जाधव यांनी केले. त्याच बरोबर या कामी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची काही मदत लागल्यास त्वरीत पुरविण्यात येईल असे सांगून आश्वस्त केले.

स्थानिक श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये ७ वा आंतरराष्ट्रीय योग दिन ऑनलाइन पध्दतीने उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी श्री बालाजी महाराज संस्थानचे वंश पारंपरिक विश्वस्त तथा महाविद्यालयाचे अध्यक्ष राजे विजयसिंह जाधव, आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ. एस.डी. चव्हाण, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थीनी ऑनलाइन उपस्थित होते. योग शिबिरात महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. किरण मोगरकर यांनी मार्गदर्शन केले. योगसत्राची सुरूवात प्रार्थनेने करण्यात आली. त्यानंतर त्यांनी योग व प्राणायामची प्रात्यक्षिके करून दाखविली. प्रत्येक आसनांचे व प्राणायामाचे फायदे सविस्तरपणे सांगितले. योग सत्राच्या शेवटी सर्वांनी समाज व विश्वाच्या शांती, आनंद व स्वास्थ्यासाठी प्रचार करण्यास बांधील राहिल असा संकल्प केला. योगसत्राचा शेवट शांतीपाठाने झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. बी. यु. काळे यांनी तर आभार प्रदर्शन एन.सी.सी केअर-टेकर डॉ. एम. आर. तांदळे यांनी केले.

श्री व्यंकटेश महाविद्यायालयामध्ये योग दिनानिमित्त प्रात्यक्षिक करून दाखवताना डॉ. किरण मोगरकर.

2. Yoga Day: Students awareness about yoga in their villages: June 21, 2021

